# अमरावती महानगरपालिका अमरावती
# महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोस्थान महाअभियानाखालील योजना
# आधुनिक कत्तलखाना तथा ई.टी.पी. संयत्रणाबाबत

अमरावती महापालिका क्षेत्राअंतर्गत वलगांव रोड तारखेडा स्थित महापालिकाचा आधुनिक कत्तलखाना बांधकाम वर्ष २००४ मधे पुर्ण झाले. सदर कत्तलखाना स्थापित करण्यासंदर्भात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने २१/०४/२००८ रोजी परवानगी प्रदान केली. तथापि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या संमती पत्रामधे नमुद परिमानकानुसार विद्यमान ठिकाणी द्रव तथा जैविक घनकचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी आवश्यक सयंत्रणा नसल्यामुळे सदर कत्तलखाना कार्यान्वित करणे शक्य झाले नाही. विद्यमान कत्तलखान्यातील जनावरांची कत्तलक्षमता १०० bovines प्रति दिवस या प्रमाणे आहे. तथापि मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने जनहित याचिका क्र. ३१/२०१० नुसार विद्यमान कत्तलखाना ई.टी.पी. सयंत्रणेसह ३१ जानेवारी २०१३ पावेतो कार्यान्वित करण्याचे निर्देश अमरावती महापालिकेस दिलेले आहे.

कत्तलखाना ईमारतीमधून निघणारे सांडपाणी तथा जैविक घनकचऱ्याच्या निर्मितीसाठी सदर कामासंदर्भी नियुक्त तांत्रिक सल्लागाराकडून प्राप्त अंदाजपत्रानुसार रु. १३२ लक्षचा खर्च अपेक्षीत होता. सदर प्रकल्पासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीने नगरोथ्थान महाअभियानाखालील योजनाअंतर्गत रु. ८५ लक्षचे अनुदान पत्र क्र. जिनिस/जिवायो/११-१२/१५७०/११, दिनांक ०४/१०/२०११ अन्वये मंजूर सुध्दा केलेले आहे. तसेच महापालिकाच्या अंदाजपत्रक (२०१२-१३) मधे ई.टी.पी. सयंत्रणा कामासाठी रु ८५ लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने ई.टी.पी. प्रकल्पाच्या निर्मितीसाठी निविदा प्रक्रियाच्या माध्यमातून मायो व्हेसलस ॲन्ड मशिन्स यांची निवड करण्यात आलेली आहे. ई.टी.पी. संयत्रणेच्या उभारणीसाठी संबधित ऐजन्सीला रु. १४५ लक्ष महापालिकास अदा करावे लागेल. तथापि कत्तलखाना कार्यान्वयनासाठी आवश्यक असणार तांत्रिक व अतांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता, त्यांची निवड प्रक्रिया तथा आस्थापना खर्च, मा. उच्च न्यायालयाचे निर्देश लक्ष्यात घेता, कत्तलखान्याशी संबधित कार्य (Operation & Maintanance) एखादया अनुभवी ऐजन्सीमार्फत होण्यास्तव सदर कामासाठी निविदा प्रक्रियाच्या माध्यमातून फिजा एक्सपोर्ट यांची निवड करण्यात आली. सदर प्रकरणी महानगरपालिका कोणताही खर्च करणार नाही. याअंतर्गत कत्तलखाना नियम २००१ अन्वये बांधकाम दुरुस्ती, तथा Operation & Maintanance च्या कामाची संपुर्ण जबाबदारी संबधित ऐजन्सीवर सोपविण्यात आली आहे.

सदर दोन्ही प्रशासकिय विषयास सन्मा. स्थायी समितीने ठराव क्रमांक २०२ व २०३ अन्वये दिनांक १६/१२/२०११ रोजी पारीत करुण दिनांक २३/१२/२०११ रोजी कायम केलेले आहे. तथापि मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ई.टी.पी. सयंत्रणेसह विद्यमान कत्तलखाना ३१ जानेवारी २०१३ पावेतो कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

सद्यास्थितीत Effluent treatment plant च्या संबधित स्क्रिन चेंबर, ग्रिट ट्रॅप, एक्वीलायजेशन टॅक, फिड टॅक, ऐरीऐशन टॅक १ व २, ची कामे जवळपास पुर्णत्वास आलेले आहे. तसेच DAF System, सेटलिंग टॅक १ व २, जैव वैद्यकिय घनकचऱ्याची सयंत्रणा ईत्यादी कामे ३० आक्टोंबर पुर्वी पुर्ण होणार असल्याचे ई.टी.पी. ऐजन्सीने त्यांच्या प्रगति अहवाल द्वारे स्पष्ट केले आहे. ई.टी.पी. संयत्रणेच्या उभारणीसाठी आजमितास रु. ६४,०९,७२५ ईतका खर्च झ ाालेला आहे. वरील प्रमाणे प्रक्रियाच्या कार्यपुर्तीनंतर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास सदर कत्तलखाना कार्यान्वित होण्यासाठी विहीत स्वरुपात अर्ज सादर करुण सदर कत्तलखाना ई.टी.पी. सयंत्रणेसह ३१ नोव्हेंबर २०१२ पुर्वी प्रथमतः प्रायोगीक स्तरावर व तदनंतर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या पुर्व परवानगीने ३१ जानेवारी २०१३ पुर्वी विद्यमान कत्तलखाना ई.टी.पी. सयंत्रणेसह कायमस्वरुपी कार्यान्वित केला जाईल.